सत्यमेव जयते

# जिल्हाधिकारी कार्यालय, (पुनर्वसन शाखा) पुणे
# नविन जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, तळमजला, ए विंग ,
# पुणे ४११००१
## ( विधी अधिकारी - कंत्राटी भरती )

****************************************************************************************************************

क्रं. जिपुअ/आस्था/कावि/२२२/२०२५ पुणे दि. २३.०६.२०२५

जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथील पुनर्वसन शाखा, पुणे येथे विधी अधिकारी या पदाची कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याच्या कालावधी साठी नियुक्ती करावयाची आहे. सदर पदासाठी पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून विहित नमुन्यांत दिनांक :-२३.०५.२०२५ पासुन दिनांक ३०.०६.२०२५ सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत अर्ज मागविणेत येत आहे.

---

| | | |
|---|---|---|
| पदाचे नांव | :- | विधी अधिकारी (कंत्राटी) |
| पदसंख्या | :- | ०१ |
| मासिक मानधन | :- | एकत्रित मानधन रुपये ८०,०००/- + ५,०००/- दुरध्वनी व प्रवास खर्च रुपये /- असे एकत्रित मानधन रुपये ८५,०००/- प्रतिमाह या व्यतिरिक्त कोणतेही भत्ते देय होणार नाही. |

### शैक्षणिक अर्हता व अनुभव :-

(1) कायदयाची एल एल बी किंवा एल एल एम असणे आवश्यक आहे

(2) उमेदवार हा सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधिश अथवा समकक्ष पदाचा असावा.

(3) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदवीधर तसेच सनदधारक असणे आवश्यक आहे.

(4) विधी अधिकारी या पदासाठी वकील व्यवसायाचा किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक.

(5) उमेदवार महसूल तसेच पुनर्वसन अधिनियमांचे विषयाचे सखोल ज्ञान असावे , सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ.बाबत ज्ञानसंपन्न असणे आवश्यक, ज्यामुळे कायद्येविषयक कार्यवाही कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

(६) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.

## --: नेमणुकीचे स्वरुप :--

विधी अधिकारी हे पद नियमित स्वरुपात नसून 11 **महिन्याकरिता पुर्णतः कंत्राटी पध्दतीने भरण्यात येईल. विधी अधिकारी हे पद शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.**

## --: विधी अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :--

(1) कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व कायदेविषयक बाबींबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

(2) महसूल विषयक परिच्छेदनिहाय अभिप्राय (Parawise Comments) तयार करणे / सेवाविषयक / प्रशासकीस बाबी / विभागीय चौकशी इ. तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

(3) प्रलंबित न्यायालयीन प्रकरण तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासनाचा प्रतिवादी आहे. अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिकाऱ्याच्या मदतीने तयार करणे,

(4) शपथपत्राचा मसूदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल, याची दक्षता घेणे.

(५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे, अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तदअनुषंगाने अपिल दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

(६) अपिल करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपिलाचा मसूदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

(७) सर्व न्यायालयीन प्रकरणांसाठी विभागीय स्तरावर नोडल ऑफिसर म्हणून काम पहाणे.

(८) विधि विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमन दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

स्थळ :- पुणे
दिनांक :- २३.०६.२०२५

**अपर जिल्हाधिकारी पुणे**

जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (पुनर्वसन शाखा)

# विधी अधिकारी (कंत्राटी पध्दतीने) पदासाठी अर्ज

**कार्यालयीन वापराकरिता**

| | |
|---|---|
| अर्ज क्र. | |
| दिनांक | |

| |
|---|
| अर्जदाराचे अलिकडच्या कालातील राजपत्रित अधिकारी यांनी साक्षांकीत केलेला फोटो चिटकवावा |

**प्रति,**

**मा. जिल्हाधिकारी,**
**(पुनर्वसन शाखा) पुणे**

विषय :- **जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालयामध्ये स्वतंत्र विधी अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने नेमणुकी बाबत अर्ज.**

संदर्भ :- संकेतस्थळ *https://pune.gov.in* येथे दि. २३/०६/२५ मधील जाहिरात.

**महोदय,**

विधी अधिकारी या पदावर नेमणुक करण्याकरीता अर्ज करीत असुन माझा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१ **अर्जदाराचे संपूर्ण नांव (अडनाव प्रथम लिहावे) (स्त्री/पुरुष)** :- ------------------------------------------------------------

२ **पत्र व्यवहाराचा पत्ता (पिनकोड व दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक ई-मेल)** :- ------------------------------------------------------------

३ **जन्म दिनांक** :- अंकात ------------------------------------------------------------
:- अक्षरात ------------------------------------------------------------

४ **जाहिरातीचे दिनांकास वय** :- ----------------------------

५ .. महाराष्ट्राचा मूळ रहिवासी आहे काय (आवश्यक प्रमाणपत्र जोडावे.

६ विवाहीत / अविवाहित :-

कृपया मागे पहा

७ विवाहित असल्यास लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र सोबत जोडलेले आहे काय --------------------

(आवश्यक प्रमाणपत्र जोडावे)

८ बार कोन्सिल ऑफ महाराष्ट्र यांचेकडील सनद क्रमांक दिनांक :- ------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------

९ अर्जदाराची शैक्षणिक पात्रता :-

| शैक्षणिक पात्रता | उत्तीर्ण वर्ष | विदयापिठ / मंडळाचे नांव | प्राप्त एकुण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| उच्च माध्यमिक शालांत परीक्षा | | | | |
| पदवी परिक्षा | | | | |
| कायदयाची परिक्षा | | | | |

१० अनुभव :-

| अ. क्र | कार्यालयाचे नांव | पद | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

११ संगणक अर्हता व इतर गुणवत्ता :-

१२ अर्जा सोबत जोडलेल्या प्रमाणपत्राची यादी :-

उमेदवाराची स्वाक्षरी

## --: उमेदवारांना आवश्यक सूचना :--

(1) शैक्षणिक अर्हता व अनुभवामधील सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज अपात्र ठरतील.

(2) अनुभवातील मराठी व इंग्रजी भाषेच्या ज्ञानाची पडताळणी करण्यासाठी तोंडी मुलाखती घेण्यात येतील.

(3) महसूल विषयक, सेवाविषयक, प्रशासनीक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायद्येविषयक कार्यवाही याबाबतचे उमेदवाराचे विशेष प्राविण्य पडताळणीसाठी आवश्यकता वाटल्यास लेखी चाचणी (पुनवर्सन प्रकरणी प्रतिज्ञापत्र दाखल करणेबाबत) घेण्यात येईल.

(4) सदर जाहिरात व त्यासोबत अर्ज व प्रतिज्ञापत्राचा विहीत नमूना या कार्यालयाचे संकेतस्थळ *https://pune.gov.in* येथे प्रसिध्द करण्यात आलेली आहे. उमेदवारांनी त्याच नमून्यात A-4 आकाराच्या कागदावर एका बाजूस टंकलिखीत / मुद्रीत करुन मुदतीत खालील पत्त्यावर दि. ३०.0६.2025 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत प्राप्त होतील अशा रितीने **ईमेल/पोस्टाने/कार्यालयात समक्ष पाठवावे**. त्यांनतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| कार्यालयाचा पत्ता | जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, ए विंग, तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे, पिन कोड नंबर ४११००१ |
| कार्यालयाचा ईमेल आयी | dropune@gmailcom |

(5) विहीत नमुन्यातील अर्ज लखोटयात बंद करुन लखोटयावर कंत्राटी पध्दतीने विधी अधिकारी पदासाठी अर्ज अशा उल्लेखासह सादर करावेत.

अर्ज पाठविण्याचा पत्ता:-

जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, पुणे ए विंग, तळमजला, नविन जिल्हाधिकारी कार्यालय ईमारत, पुणे १

(6) दि.३०.0६.2025 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून दि. ०२.०६.२५ रोजी पात्र उमेदवारांच्या अर्जाची यादी *https://pune.gov.in* या संकेतस्थळावर तसेच कार्यालयाचे सुचना फलकावर लावून प्रसिध्द करण्यात येईल.

(7) अंतिम निवड झालेल्या उमेदवाराचे नाव यथावकाश कार्यालयाचे सुचना फलकावर तसेच संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(8) निवड झालेल्या उमेदवारास शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. ईएसटी-2013/प्र.क्र.173/ई-8, दि.14.11.2013 मध्ये विहीत केलेल्या नमुन्यातील करारनामा करुन देणे बंधनकारक राहिल.

(9) कंत्राटी पध्दतीने विधी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या उमेदवारास दररोज संपूर्ण कार्यालयीन वेळेत कामकाज करावे लागेल. तसेच नेमनूकीच्या पदाच कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील.

(10) या प्रक्रीयेमध्ये बदल करण्याचा अथवा स्थगिती / रद्द करण्याचा अधिकार मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना राहिल व त्यांचा निर्णय अंतिम असेल,

## प्रतिज्ञापन

मी, श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------------------------------श्री-------------------- ------------------------यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ------------वर्ष, रा.------------------ -------------------याव्दारे असे जाहीर करतो की,

१) मी, --------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला --------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----आहे.(असल्यास,जन्म दिनांक नमूद करावे)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे सदर पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :- /०६/२०२५

अर्जदाराची स्वाक्षरी
(नाव व पत्ता)

***************************************************************************

## प्रतिज्ञापत्र

मी याद्वारे शपथपुर्वक कथन करतो / करते की, अर्जात नमुद केलेली माहिती माझ्या माहिती नुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही गोष्ट खोटी / चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रियेपासून अपात्र घोषित केले जाईल आणि जर निवड / नेमणूक झाल्यास, माझी सेवा कोणतीही सूचना दिल्याविना समाप्त केली जाईल, याची मला जाणीव आहे.

मी याद्वारे शपथ पुर्वक कथन करतो / करते की, मला शासकीय सेवेकरीता अपात्र घोषित केलेले नाही. मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही माझ्या विरुध्द कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित नाही.

ठिकाण :-

दिनांक :- /०६/२०२५

अर्जदाराची स्वाक्षरी
(नाव व पत्ता)